देवस्थान व्यवस्थापन समिती
पश्चिम महाराष्ट्र, कोल्हापूर

# देवस्थान व्यवस्थापन समिती, पश्चिम महाराष्ट्र, कोल्हापूर

(विधी व न्याय विभाग अंतर्गत)
२४०२ "ए " वॉर्ड, अपना बँक बिल्डींग तळमजला, उभा मारुती चौक, शिवाजी पेठ, कोल्हापूर
फोन नं.(०२३१) २६२६१४७, २६२६७५० फॅक्स: (०२३१) २६२६७५०
E-mail - dmckolhapur@gmail.com Visit : www.mahalaxmikolhapur.com

क्र.देव.वशि/जा/९४५४/२०२४ दि. 0 8 AUG 2024

## जाहीर नोटिस

ज्या अर्थी मी खाली सही करणार सचिव,देवस्थान व्यवस्थापन समिती,पश्चिम महाराष्ट्र,कोल्हापूर या जाहीर नोटीसीव्दारे प्रसिध्द करतो की,मौ.देवरवाडी ता.चंदगड जि.कोल्हापूर येथील श्री.वैजनाथ देव अधिसूचना क्रमांक २१५२ व रजिस्ट्रेशन क्रमांक ३६२४ हे महाराष्ट्र शासनाने व्यवस्थेसाठी या कार्यालयाकडे सुपूर्द केलेले आहे.सदर देवाचे मालकीची मौ.देवरवाडी ता.चंदगड जि.कोल्हापूर येथील देवस्थान जमिन सर्व्हे नंबर.२१६ क्षेत्र १७५ हे. -७४ आर,पैकी १७३ हे ७४ आर या जमिनीत सप्टेंबर २०२४ ते डिसेंबर २०२५ या १६ महिन्यात नैसर्गिकरित्या उगवणारी फळे काढून नेणेचा जाहीर लिलाव करणेत येणार आहेत. अपसेट प्राईस ३,३०,०००/- राहिल

सदर लिलावामध्ये ज्यांना सहभाग नोंदविणेचा आहे.त्यांनी या जमिनीची प्रथम पाहणी करुन यावे सदर जमिनीचा जाहीर लिलाव हा दि.२०/०८/२०२४ रोजी दुपारी ०१-०० वा.देवस्थान व्यवस्थापन समिती मुख्य कार्यालय,ए वार्ड शिवाजी पेठ,अपना बँक तळमजला कोल्हापूर.यथे होणार आहे. सदरचा जाहीर लिलाव हा सचिव,देवस्थान व्यवस्थापन समिती पश्चिम महाराष्ट्र कोल्हापूर यांचे समोर मंजूरी अंतरावर पूरा करणेत येणार सदर लिलावाच्या अटी व शतीचे लिलावाच्या ठिकाणी वाचन करणेत येईल. सदर लिलावाच्या अटी व शर्ती यामध्ये बददल करणेचे अधिकार राखून ठेवणेत आले आहेत.कोणतेही कारण न देता सदरची लिलाव प्रक्रिया स्थगित अथवा रदद करण्याचे अधिकार देवस्थान व्यवस्थान समितीस राहीतील सदर लिलावामध्ये मंजूर होणारे लिलावधारक यांनी लिलावाची किमान निम्मी रक्कम जमा करणे आवश्यक राहील.त्यानंतर १५ दिवसांत उर्वरित रक्कम जमा करणे बंधनकारक राहील.

लिलावाचे टिकाण:- देवस्थान व्यवस्थापन समिती पश्चिम महाराष्ट्र,मुख्यकार्यालय कोल्हापूर.

Shivraj
08/08/2024
सचिव
देवस्थान व्यवस्थापन समिती
पश्चिम महाराष्ट्र कोल्हापुर.

प्रत:-१)मा.जिल्हाधिकारी कार्यालय,कोल्हापूर यांना माहितीसाठी व नोटिस बोर्डावर प्रसिध्दीसाठी.
२)मा.तहसिलदार चंदगड ,तहसिलदार कार्यालय चंदगड योना माहितीसाठी व नोटिस बोर्डावर प्रसिध्दसाठी.
३)सरपंच ग्रामपंचायत,देवरवाडी,ता.चंदगड यांना नोटीस बोर्ड वर प्रसिध्दी करणे व दंवडी देऊन लिलवाचे वेळी उपस्थित राहणेसाठी.
४)गावकामगार तलाठी चंदगड यांना माहितीसाठी व नोटिस बोर्डवर प्रसिध्दीसाठी.
५)कार्यालयीन नोटीस बोर्डवर व वेबसाईटवर प्रसिध्दीसाठी.
६)शहर कोल्हापूर येथील प्रमुख स्थानिकमंदिरे श्री.करवीरनिवासिनी, ओढयावरीलश्री.सिध्दीविनायक, श्री.बिनखांबीगणेस मंदिर जि.कोल्हापूर येथील नोटीस बोर्डवर प्रसिध्दीसाठी.

देवस्थान व्यवस्थापन समिती
पश्चिम महाराष्ट्र, कोल्हापूर

# देवस्थान व्यवस्थापन समिती, पश्चिम महाराष्ट्र, कोल्हापूर

(विधी व न्याय विभाग अंतर्गत)
२४०२ "ए " वॉर्ड, अपना बँक बिल्डींग तळमजला, उभा मारुती चौक, शिवाजी पेठ, कोल्हापूर
फोन नं.(०२३१) २६२६१४७, २६२६७५० फॅक्स: (०२३१) २६२६७५०
E-mail - dmckolhapur@gmail.com Visit : www.mahalaxmikolhapur.com

क्र.देव.वशि/जा/ /२०२४ दि. /२०२४

## मौ. देवरवाडी ता. चंदगड जि. कोल्हापूर येथील श्री वैजनाथ देवस्थान जमिन सर्व्हे नंबर २१६ क्षेत्र १७५ हेक्टर ७४ आर पैकी १७३ हेक्टर ७४ आर या जमिनीत नैसर्गिकरित्या उगवणारी काजू, चिंच, हिरडा तसेच शिकेकाई, वगैरे फळे काढून नेणेचा सप्टेंबर २०२४ ते डिसेंबर २०२५ या १६ महिन्यांच्या कालावधीचा जाहीर लिलावसंबंधीचे नियम व अटी

१) सदरचा लिलाव हा सचिव देवस्थान व्यवस्थापन समिती ,पश्चिम महाराष्ट्र कोल्हापूर यांचे समोर मंजूरी अंतरावर तीन वार पुरा करणेत येईल.

२) सवाल बोलणारे जमिन पाहून सवाल बोलणेचा आहे.याबाबत नंतर कोणतीही तक्रार ऐकली जाणार नाही.

३) लिलाव पूर्ण होताच लिलावदार यांनी लिलावाची संपूर्ण किंवा निम्मी रक्कम जागेवर रोख किंवा धनादेशाने जमा करणेची आहे. त्यानंतर १५ दिवसात उर्वरित रक्कम जमा करणे बंधनकारक राहील.तसेच कबुलायत करुन मिळणार नाही.

४) लिलावदार यांनी लिलाव रक्कमे शिवाय इतर सरकारी कर परस्पर भरणेचे अटीवर पूरा केला जाईल.

५) लिलवसंबधीची रक्कम रु.१००/- चे स्टॅम्पपेपरवर करारपत्र पूर्ण करुन देणेचे आहे.

६) वरील जमिनीतील सदर लागणी लिलाव सालामध्ये नैसर्गिक आपत्ती आलेस,जळीत झालेस अगर चोरी झालेस त्याची सबब अगर तक्रार ऐकली जाणार नाही.

७) सदरहु जमिन लिलाव जामीने घेणार यांनी स्वत: हा करावयाची असून त्यामध्ये पोटकुळ वगैरे घेता येणार नाही.पोटकुळ घेतलेले निर्देशनास आलेस कोणतीही पूर्व सुचना न देता ती सदरची जमिन काढून घेणेत येईल.

८) जमिनीतील झाडांचे संरक्षण लिलावधारक यांनी करणेचे आहे.झाडांचे नुकसान झाल्यास पंचाच्या मते ठरेल ती रक्कम भरुन घेणेत येईल.देवस्थान समितीस योग्य वाटेल ती ठरवतील ती रक्कम जमा करणेची आहे.

९) सदर जमिनीची लिलावदारक यांनी खराबी केलेस ती जमिन त्यांचेकडून काढून घेणेत येईल.

१०) सदर जमिनीमध्ये लिलाव घेणारे यांना विकसन करावयाचे झालेस देवस्थान व्यवस्थापन समिती पश्चिम महाराष्ट्र कोल्हापूर यांची पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे.परवानगी देणे अगर न देता सदरची जमिन सरकार कब्जात घेणेत येईल.

११) सदरचा लिलाव मंजूर अगर नामंजूर करणेचे अधिकार प्रशासक, देवस्थान व्यवस्थापन समिती पश्चिम महाराष्ट्र कोल्हापूर यांना असून याबाबत कोणतीही तक्रार ऐकली जाणार नाही.

१२) उपरोक्त नमुद केलेल्या कोणत्याही अटी व शर्तीचा भंग झालेस कोणतीही पुर्व सुचना अथवा नोटीस न देता सदरची जमिन सरकार कब्जात घेणेत येईल.

१३) सदर जमिनीतून पक्का रस्ता,अथवा अन्य प्रयोजनाचा वापर करणेचा नाही.तसेच शासनाकडून काही आदेश/निर्देश झालेस त्याचे पालन करणे बंधनकारक राहतील.

१४) सदर जमिनी संबधी शासनाने या आधिचे व या नंतरचे सर्व कायदे,नियम मार्गदर्शक,निर्देश हे लिलाव घेणा-याचेवर बंधनकारक राहतील.

१५) सदरचा लिलाव हा सप्टेंबर २०२४ ते डिसेंबर २०२५ या कालावधीपुरता मर्यादित असून जमिनीचे कोणत्याही प्रकारचे नुकसान करणेचे नाही.अगर झाड तोड,उत्खनन करणेचे नाही.तसेच देवस्थान जमिनीवर मालकी हक्क सांगणेचा नाही.

१६) सदर देवस्थान जमिनीतील फक्त फळे (काजू, चिंच, हिरडा, शिकेकाई) काढून नेणेचा असून कोणत्याही प्रकारचे देवस्थान जमिनीचे नुकसान करणेचे नाही. अगर झाडतोड करणेची नाही.

१७) नैसर्गिक आपत्तीमूळे झाडास फळे न लागलेस जमा केलेली रक्कम कोणत्याही परिस्थितीमध्ये परत मिळणार नाही.

१८) बयाणा रक्कम रू २०,०००/- चा राष्ट्रीयकृत बँकेचा डिमांड ड्राफ्ट प्रशासक देवस्थान व्यवस्थापन समिती, पश्चिम महाराष्ट्र कोल्हापूर यांचे नांवे काढून अथवा रोख रक्कम जमा केले नंतरच लिलावात भाग घेणेस परवानगी देणेत येईल.

१९) लिलावाचे वेळी ज्यांची बोली सर्वाधिक असेल त्यांचे नांवे मंजूरी अंतरावर लिलाव पूर्ण करणेत येईल. सर्वाधिक बोलीधारकांने लिलाव घेणेस नकार दिलेस जमा केलेली बयाणा रक्कम जप्त करणेत येऊन नंबर २ चे बोलीधारकास संधी देणेत येईल. तसेच सर्वाधिक बोलीत २ नंबरची बोली यामधील असलेल्या फरकाची रक्कम १ नंबरचे बोलीधारकांकडून वसूल करणेत येईल.

२०) वरील शर्तीचे यादीत ऐनवेळी फेरबदल करणेचा अधिकार लिलाव करणारे अंम्मलदार यांना राहतील.

Shivsingh
03/09/2024

**सचिव**
**देवस्थान व्यवस्थापन समिती,**
**पश्चिम महाराष्ट्र कोल्हापूर.**